नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 13/06/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

## शासन अनुदानित घरगुती सिलेंडर मधुन लहान व्यवसायीक सिलेंडर गॅस मध्ये अवैधरित्या रिफील करून काळाबाजारी करणारा गजाआड .......
## ( स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कार्यवाही )

दिनांक 12/06/2020 रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर ग्रामीण अंतर्गत मातापूरा कळमेश्वर वार्ड क्र. 17 येथे घरगुती सिलेंडर गॅसचे व्यवसायीक लहान सिलेंडर गॅस मध्ये अवैधरित्या रिफील करून षासन दरापेक्षा जास्त दरात विक्री करून काळाबाजरीचा चा व्यवसाय सुरू आहे अशा गोपनिय माहितीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उप विभागात पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या माहितीची शहानिशा करुन वरिष्ठांना तशी माहिती देवून त्यांच्या मार्गदर्शनानुसार तहसिल कार्यालय कळमेश्वर येथील पुरवठा विभागाचे अधिकारी यांना सोबत घेवून, रेड कार्यवाही केली असता, इसम नामे– ईसराईल वल्द करीम शेख, वय 52 वर्ष, रा. मातापुरा कळमेश्वर वार्ड क्र. 17 येथे आपले राहते घरी घरगुती सिलेंडर गॅसचे नोजलच्या सहाय्याने व्यवसायीक लहान सिलेंडर गॅस मध्ये अवैधरित्या ज्वलनशील गॅस हयगयीने कोणतीही खबरदारी न घेता रिफील करतांना रगेंहात मिळून आला. त्याचे ताब्यातुन एकूण 6 घरगुती वापराचे सिलेंडर, 2 लहान व्यवसायीक सिलेंडर, 1 रिफीलींग नोजल, 1 वजन काटा, 1 पाना अश्या रु. 9,400/– च्या साहित्यासह ताब्यात घेवून पोस्टे कळमेश्वर येथे अप.क्र.413/2020 कलम 3,7 जीवनावश्यक वस्तु अधिनियम तसेच सह कलम 285 भादवि नुसार नोंदवून सदर आरोपीस पुढील कार्यवाही करीता जप्त साहित्यासह देण्यात आले. पुढील तपास पोस्टे कळमेश्वर करीत आहे.

आरोपी हा व्यवसायीक लहान सिलेंडर रिफील करण्याकरीता तो 500 ते 800 रु. घेवुन अवैध विक्री करीत होता. आरोपी ज्या ठिकाणी राहतो ती कळमेश्वर शहरातील दाट वस्ती आहे. थोडीही चुक झाल्यास त्यास व वस्तीतील लोकांना गंभीर परिणाम भोगावे लागतील याची जाणीव असुनसुध्दा स्वतचे आर्थिक फायदयाकरीता तो हा व्यवसाय करीत होता.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, श्रीमती मोनिका राऊत अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात मा. श्री. अनिल जिटटावार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा , पोउपनि नरेंद्र गौरखेडे, सपोउपनि जयप्रकाश शर्मा, पोशि महेश बिसने, चालक सपोउपनि साहेबराव बहाळे सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण तसेच निरीक्षण अधिकारी, श्रीमती एन.एन.साकळे, व पुरवठा अधिकारी, बालाजी धवस, तहसिल कार्यालय कळमेश्वर यांनी पार पाडली.

### जाहीर आव्हान

सदरची कारवाई पाहता मा. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी सर्वसामान्य जनतेला आवाहन केले आहे की, अशा प्रकारचे कृत्य आपल्या परिसरात कुणी करीत असेल तर त्वरीत संबंधीत पोलीस स्टेशन अथवा स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथे कळवावे.



## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर पारशिवनी साईबाबा सोसायटी येथे दिनांक 01/06/2020 दिपक सिताराम कैवाल, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 दत्तनगर, खापरखेडा हा दि. 01/06/2020 चे 10.00 वा. दरम्यान पारशिवनी येथील साईबाबा सोसायटी मध्ये टिनाचे शेड खोलन्याचे कामावर गेला होता. तो काम करित असतांना अचानक तोल गेल्याने तो खाली पडला. दरम्यान दिपक कैवाल याच्या डोक्याला मार लागल्याने त्यास उपचारकामी नर्सिंग हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता उपचार दरम्यान दि. 03/6/20 चे 14:45 वा. त्याचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रदिप सिताराम कैवाल, वय 21 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 दत्तनगर खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप बासोडे 9823083905
हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर